

डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे ह्या कै. रमेश वरपूडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी, महाराष्ट्र येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून गेल्या 22 वर्षापासून कार्यरत आहेत. "ग्रामीण भागात नोकरी करणा या महिलांच्या समाजशास्त्रीय अभ्यास"( विशेष संदर्भ परभणी जिल्हा) हा त्यांचा (Ph.D) संशोधनाचा विषय आहे. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत पीएचडी संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त असून त्यांच्या चार विद्यार्थ्यांचे (Ph.D.) संशोधन कार्य प्रगतीपथावर आहे. त्यांचा women Studies हा specialization विषय आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या सदस्य म्हणून 2012 ते 2017 या कालावधीत त्यांनी कार्य केलेले आहे. त्यांचे 50 पेक्षा जास्त संशोधनपर लेख विविध मासिकात, पुस्तकात, वर्तमानपत्रातून प्रकाशित झाले आहेत. त्यांनी विवीध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, पातळीवरील परिषदेत शोधनिबंधाचे वाचन केले असून त्यासाठी त्यांना UGC ने Travel Grant मंजूर केलेले आहे. विविध राष्ट्रीय सेमिनार्स, कॉन्फरन्सेस ,वर्कशॉप्सचे त्यांनी आयोजन केले आहे. विविध राष्ट्रीय कन्सरन्सेस ,सेमिनार्स, वर्कशॉप मध्ये साधन व्यक्ती म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले आहे. 2 संदर्भ पुस्तकांचे लेखन व विविध सामाजिक विषयावरील 10 पुस्तकांचे संपादन केले आहे. ग्रामीण महिलांच्या जाणिव जागृतीसाठी विविध सेवाभावी संस्था , पोलिस स्टेशन, न्यायालय, नगर परिषद, पत्रकार संघ यांच्या मदतीने त्यांनी कार्यक्रमांचे आयोजन व मार्गदर्शन केले आहे. त्यांनी 50 पेक्षा जास्त सामाजिक आशयाशी संबंधित असणाऱ्या स्वरचित कवितांचे लेखन केलेले असून त्यांचा काव्यसंग्रह लवकरच प्रकाशित होत आहे.



डॉ. बळीराम पवार हे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, महाराष्ट्र येथून समाजशास्त्रा या विषयात एम.ए केले आहे. मदुराई कामराज विद्यापीठ, मदुराई, तामिळनाडू येथून एम.फिल केले आहे. त्यांनी पीएच.डी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून पदवी प्राप्त केली आहे.सध्या ते महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव, लातूर महाराष्ट्र येथे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांना 23 वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे आणि त्यांनी अनेक वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून काम केले आहे. या व्यतिरिक्त ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन अशा विविध क्षेत्रात सामाजिकरित्या सक्रिय आहेत आणि त्यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांना 5 आंतरराष्ट्रीय आणि 7 राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी 56 हून अधिक आंतरराष्ट्रीय जर्नल्स आणि 15 राष्ट्रीय स्तरावरील पुस्तकांचे संपादन केले. मराठी समाजशास्त्र परिषद महाराष्ट्राचे खजिनदार म्हणूनही काम केले आहे. भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सदस्य आहेत. तथापि त्यांनी आपले शोधनिबंध विविध परिषदांमध्ये/सेमिनारमध्ये सादर केले आहेत. त्यांचे शोधनिबंध विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नियतकालिके आणि पुस्तकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.

Sanskruti Publication Latur
ISBN 978-81-971567-9-3
9 788197 156793

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Dist. Parbhani

महिलांच्या वर्तमानकालीन समस्या
डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे , डॉ. बळीराम पवार

# महिलांच्या वर्तमानकालीन समस्या



डॉ.सुनीता आत्माराम टेंगसे  डॉ. बळीराम पवार

# महिलांच्या वर्तमानकालीन समस्या

**डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपुडकर कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय सोनपेठ
जि. परभणी, महाराष्ट्र

**डॉ. बळीराम पवार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले कॉलेज किनगाव,
ता. अहमदपूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

Sanskruti Publication Latur
संस्कृती पब्लिकेशन, लातूर

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

ISBN : 978-81-971567-9-3

• **महिलांच्या वर्तमानकालीन समस्या**

डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे, डॉ. बळीराम पवार

© संपादक 2024

• प्रकाशक

संस्कृती पब्लिकेशन
गायकवाड निवास, गणेश नगर, जुना औसा रोड,
लातूर, ता. जि. लातूर - 413512.

मो नं - 9403163700

• अक्षर जुळवणी

श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

• मुखपृष्ठ

श्री. चंद्रकांत कांबळे

• मुद्रक
ज्योतीचंद्र ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर.

• प्रथमावृत्ती : मे 2024

---

नोंद - सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग प्रकाशक आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा इतर इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक पद्धतीसह कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनरुत्पादित, वितरित किंवा प्रसारित केला जाऊ शकत नाही.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# अनुक्रमणिका



| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | महिलांच्या समस्या आणि मानवी हक्क<br>**प्रा. डा. व्ही. एन. कांबळे** | ०१ |
| २ | भारतातील आदिवासी स्त्री<br>**प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधार** | ०६ |
| ३ | भारतीय आत्मनिर्भरतेचा इतिहास आणि दिशा<br>**प्रा. पंढरी जी. मोरे, डॉ. विठ्ठल एन. ठावरी** | ११ |
| ४ | असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांची स्थिती आणि त्यांच्या समस्या<br>**प्रा. अनिल चिं. सावळे** | १९ |
| ५ | मानव विकास व त्याचे निर्देशांक : भारतातील सद्यस्थिती विशेष संदर्भ मराठवाडा विभाग उपविषय : मानव विकास व त्याचे निर्देशांक एक अभ्यास<br>**डॉ. चारुशीला विजयराव पाटील** | २६ |
| ६ | महिला सक्षमीकरण : एक चिंतन<br>**डॉ. विठ्ठल निळकंठ ठावरी** | ३६ |
| ७ | आदिवासी स्त्री जीवन<br>**प्रा. डॉ. एस. डी. अभुंरे** | ४५ |
| ८ | लैंगिक अत्याचाराची कारणे व परिणाम<br>**प्रा. डॉ. दिलीप घोंगडे** | ५२ |
| ९ | कौटुंबिक हिंसाचार एक ज्वलंत समस्या<br>**प्रा. डॉ. फरीदा शफिक खान** | ६४ |




PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# 7.
# आदिवासी स्त्री जीवन

प्रा. डॉ. एस. डी. अभुंरे
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

**प्रस्तावना:-**

नागरी संस्कृती पासून दूर व अलिप्त राहणारे परंतु मूळचे ते संबंधित प्रदेशातले असल्यामुळे त्यांना मूळ पुरुष किंवा आदिवासी असे म्हणतातआदी म्हणजे अगोदर वाशी म्हणजे राहणारे आदिवासी सर्वसाधारणपणे जंगलात. दुर्गम भागात. दर्या- खोऱ्यात आणि सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात वस्ती करून राहतात. प्रत्येक आदिवासी समूहाची भाषा. संस्कृती .रूढी -परंपरा ह्या वेगवेगळ्या असतात. जगातल्या प्रत्येक देशात आदिवासी समूह राहत असतो .तो समोर त्या त्या देशातला मूळ रहिवासी असतो. काही आदिवासी समूहाचा विकास होऊन तिथे नागरी संस्कृत निर्माण झाली आहे. आदिवासी लोकांना बोली लिपी नसल्यामुळे आदिवासी समाज निरक्षर दिसून येतो. आदिवासी समाजाला इंग्रजीत एबोरिजिनल म्हणतात तसेच प्रिमिट्विह्व म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि सॅव्हेज म्हणजे मागासले किंवा रानटी लोक आदिवासी लोकांची जडण-घडण इतर संस्कृती पेक्षा वेगळी असते. भारतात प्राचीन काळात त्यांना दशु, निषाद, आधदी असे म्हटले आहे. आदिवासी समाज डोंगरी भागात राहतो तो आधुनिक जीवनापासून कोसो दूर राहतो. म्हणून आदिवासी समाजात दारिद्र्य, कुपोषण, अज्ञान, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा स्त्रियावर अत्याचार. होत असतात आदिवासी स्त्रिया म्हणजे जमीनदाराची खाजगी मालमत्ता समजली जाते. त्यांना उपाशी ठेवणे मारहान करणे असा आदिवासी स्त्री

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

बद्दल दृष्टिकोन असला तरी आदिवासींच्या स्त्रियांना त्यांच्या अंतर्गत सामाजिक स्वातंत्र्य होते कारण.आदिवासी समाजात त्यांना आपला पती निवडण्यास अधिकार आहे. आदिवासी भाषेत कोणती शिवी देता येत नाही. यावरुन असे दिसून येते सामाजिक जीवनात आदिवासी स्त्रियांचा आदिम काळात विकास झाला होता.

**शोध निबंधाचा उद्देश:-**

१) आदिवासी स्त्रियांचा चिकित्सक अभ्यास करणे

२) आदिवासी स्त्री मातृ सत्ताक पद्धतीचा अभ्यास करणे

३) आदिवासी स्त्रियांचा धार्मिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे

४) आदिवासी स्त्रियांचा शैक्षणिक दृष्ट्याअभ्यास करणे

५) आदिवासी स्त्रियांचा सांस्कृतिक दृष्ट्या अभ्यास करणे

**गृहीतके:-**

१) आदिवासी कुटुंबात मात् सत्ताक व पितृसत्ताक पद्धत दिसून येते

२) आदिवासी स्त्री धार्मिक रुढी परंपरा गुंतलेली दिसून येते

३) आदिवासी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने शेतात काम करते.

४ आदिवासी स्त्री अज्ञानी व अडाणी दिसून येते

५) अधिवेशन ची वेशभूषा केस भुषा इतर संस्कृतीपेक्षा वेगळी असते

**आदिवासी स्त्रियांची स्थिती:-**

आदिवासी स्त्री दर्जा बद्दल इतिहास कारात मतभेद आहेत. काहींच्या मते आदिवासी स्त्री गुलाम असते कारण तिला पैसे देऊन विकत घेतलेले असते. त्यामुळे स्त्रियांची स्त्रियांशी वाईट वर्तन केले जाते. भारतातील खाशी जमातीत मालमत्ता आईकडून मुलीकडे जाते. लग्नाच्या अगोदर मुलीचा भाऊ संपत्तीचा कारभार पाहतो आणि लग्नानंतर मुलीचा पती संपत्तीचा कारभार पाहतो .परंतु राजकीय व धार्मिक जीवनात पुरुष्यांचा वर चष्मा असतो असे दिसून येते. परंतु मातृसत्ताक कुटुंबात स्त्रीचा दर्जा उच्च असतो. परंतु

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431510
Ta.Sonpeth Dist.Parbhani



पुरुष यांना लग्नानंतर कमीत कमी पाच वर्षे सासर्याकडे राहावे लागत असत मात्र सत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहेत ऑस्ट्रेलिया. आफ्रिका. येथे काही जमाती तर भारतात खासी तर अमेरिकेतील ईराक्वाईट जुब्नो टुलीनागीट या जमाती मात्र सत्ताक आहेत.

**आदिवासी स्त्रियांची दिनचर्या व आर्थिक जीवन:-**

भारतातील किंवा जगातील आदिवासी समूह असो हा जंगलात राहणारा समूह आहे. आदिवासी समाजाचा आर्थिक दृष्ट अभ्यास केला तर शेती पशुपालन. शिकार. हा व्यवसाय दिसून येतो. आदिवासींच्या आर्थिक जीवनात स्त्रियांचा फार मोठा हातभार असतो. आदिवासी स्त्रियांची दिनचर्या साधी व सरळ असते. भल्या पहाटे उठने अंगणातील झाडलो करणे. आंबील .भात. भाजी. करून पतीसोबत शेतात जात असे. दिवसभर शेतातले कामे करून संध्याकाळी घरी येताना रानभाज्या, कंदमुळे, बाबूंचे कुंबे, फुले, आळंदी, द्रोण पत्रावळीसाठी पाने आधी घेऊन येणे. आदिवासी कुटुंबात वृद्ध . म्हातारे यांची काळजी घेत असत. गावातील न्यायनिवाडा स्वतःची बाजू समर्थपणे मांडत असत. आदिवासी मध्ये सामूहिक जीवन पद्धत .सामूहिक निर्णय घेने. आवश्यक तेवढेच पिकवणे. जंगलाचे रक्षण करणे. अशा बऱ्याच गोष्टी त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहेत. परंतु आज आदिवासी समोर आर्थिक सामाजिक प्रश्न आहेत इंग्रजांनी 2864 ला जंगल संरक्षण कायदा तयार करून आदिवासीवर अनेक बंधन आणली. त्यांनी आदिवासींच्या जमिनीवर ताबा मिळून आदिवासींची सामुहिक जमीन वैयक्तिक मालकीची केली. याचा फायदा सावकार. कंत्राटदार. दलाल यांनी घेतला या कायद्यामुळे आदिवासींना आपल्या पारंपारिक हक्कांना मुकावे लागले. भारतात आज फार मोठे धरण आहेत त्या धरणाला बऱ्याच आदिवासींच्या जमिनी गेल्या आहेत .परिणामी आदिवासींमध्ये हा विस्थापनाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे शेतीच्या अयोग्य नियोजनामुळे आदिवासी जगन

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

पशुपालन करणाऱ्या 87% जमातीला व शेती करणाऱ्या 73 टक्के जमातीत स्त्रियांचा दर्जा निकृष्ट असतो. शेती व पशुपालन ही पुरुषांची कामे असतात हे कारण दिल्या जाते. परंतु अन्नसंकलन करणाऱ्या कादर, मलपंथरम. पलियन. इरुला पानियन, नियम, चेंचु, अंदमान पीग्मी, इत्यादी आदिवासींना वारसा हक्काचे काही नियम नसल्याने त्या जमातीत स्त्री-पुरुषांना समान दर्जा असतो पित्रनिवासी जमातीत पुरुषात जास्त अधिकार असतो स्त्रीवर अनेक निर्बंध घालण्यात आलेले असतात विशेष धर्मविषयक निर्बंध असतात बाळंतपण. रजोदर्शन या काळात दूध उत्पादनावर परिणाम होऊ नये म्हणून निषेध नियम केलेले असतात. गोंड जमातीत स्त्रीस विवाहपूर्व लैंगिक स्वातंत्र्य असून आपला जोडीदार निवडण्याचा हक्क व घटस्फोटाचा अधिकार असतो .खार जमातीत पुरुषा वर स्त्रियांचा वचक असतो कारण स्त्रियांना चटुकाचे ज्ञान असते असा त्यांचा समज आहे.

**आदिवासी स्त्री कुटुंब जीवन:-**

आदिवासी कुटुंब जीवनाचा अभ्यास केला तर आदिवासी जमाती कुटुंब मातृसत्ताक व पितृसत्ताक पद्धतीची दिसून येते. मातृसत्ताक पद्धतीमध्ये वंश परंपरा मातेच्या नावाने चालतो तर पितृसत्ताक पद्धतीत वंशपरंपरा पित्याच्या नावाने चालते मात्र सत्ता कुटुंब पद्धतीत विवाहाच्या नंतर मुलगी आई-वडिलांच्या घरी राहते आर्थिक व्यवस्थापन लग्न अगोदर भाऊ बघतो लग्नानंतर पती आर्थिक व्यवहार सांभाळतो संपत्तीत मात्र मातेचाच अधिकार असतो. धार्मिक. सामाजिक. राजकीय. क्षेत्रात स्त्रियांना महत्त्व असते . मातृसत्ताक पद्धतीत पुरुषांना दुय्यम स्थान असले तरी पुरुषांना देखील आदराने वागविले जाते भारतातील खाशी तोडा .नाय.र ईरावत व गारी या जमातीमध्ये मात मातृसत्ताक पद्धत दिसून येते अशा प्रकारे दोन्ही पद्धतीची कुटुंब जीवन असते. मातृसत्ताक पद्धती मुळे पती कुटुंबास स्थायी किंवा अस्थाई घटक असत पुढे कडील आदिवासी समाजात

त्यांची दिनचर्या इत्यादीचा अभ्यास केल्यानंतर आजही आदिवासींची जीवन मनावे तसे सुधारलेले नाही. आज आदिवासी कल्याण योजनेच्या अंतर्गत शासनातर्फे अनुदानाची खिरापत वाटली जाते. हे अनुदान कोणाच्या खिशात जाते त्याचा शोध घेतला पाहिजेत. आदिवासी आश्रम शाळांना भरीव अनुदान मिळते म्हणून गावा गावातून आदिवासी आश्रम शाळा सुरू झाल्या आहेत. या आदिवासी आश्रम शाळा मधून वास्तव्य करणाऱ्या आदिवासी मुलींचे असंख्य प्रश्न आहेत. या मुलीवर सहजपणे लैंगिक अत्याचार केले जातात. शिक्षणापासून व्यवस्थापक पर्यंत अनेकांच्या यात समाज असतो. अशा अनेक घटना झाल्या आहेत. कधीकाळी लैंगिक दृष्ट्या मुक्त असलेली आदिवासी स्त्री आज लैंगिक अत्याचाराची बळी ठरत आहे. बाईच्या विन्यांशाचा प्रवास नाही का?

आदिम अवस्थेपासून झालेली माणसाची उत्क्रांती धर्म आणि जात वास्तविक विभागली गेली. तसा बाईचा प्रवास अधिक बिकट झाला. जंगलात राहणारी आणि आदिम मातृसत्ताक संस्कृतीचे प्रतीक समजली जाणारी आदिवासी स्त्री देखील या शोषणापासून लांब राहू शकली नाही. चंद्रपूर गडचिरोली भागातील आदिवासी स्त्रिया नक्षलवादाच्या लैंगिक अत्याचारांना बळी पडताना दिसत आहे. तर दुसरीकडे पोलीस अधिकारी देखील स्त्रियांची विटंबना करतात या सगळ्या विटंबनेचा इतिहासात आदिवासींना मुख्य धारणेत आणा म्हणजेच नेमके काय करा हा प्रश्न सुटत नाहीत. आदिवासी स्त्री-पुरुषांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय लुटमार करून त्यांना देशोधडीला लावण्याचे उद्योग सरास सुरू आहेत. त्याचे उदाहरण म्हणून मागच्या वर्षी मिझोराम मध्ये आदिवासी स्त्रियांना लग्न फिरवण्यात आल्या आहे. यावरून आज सुद्धा आदिवासींची स्थिती अतिशय वाईट चिंतनीय असल्याचे आपल्याला दिसून येते.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



संदर्भ ग्रंथ

१) आदिवासी समूहाचा इतिहास:-विकिपीडिया लेख
२) आदिवासी स्त्रियांची स्थिती लेख एप्रिल 2016:-अंजली कुलकर्णी
३) आदिवासी विकासातील अडथळे:-डॉक्टर गोपाळ गवरे
४) आदिवासींच्या योजना:-महाराष्ट्र शासन स्त्री जीवन

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani